(30)

राज्यातील अभियांत्रिकी महाविद्यालयाचे (11)
गुणात्मक व दर्जानिहाय वर्गीकरण

---

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्रशिक्षण विभाग,**
शासन निर्णय, क्रमांक : पीईसी-२००३/(२१२/०३)/तांशि-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १९ ऑगस्ट, २००३

संदर्भ : १) शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
क.पीईसी-२०१६/(७३५९)/तांशि-१, दि.३१.५.१९९७
२) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
क्र.पीईसी-१०२०००/(२३२/००)/तांशि-१,दि.२१.६.२०००
३) संचालक तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई १ यांची
क्र.२/एनजीसी/२००२/दर्जा वर्गीकरण/५००३ दिनांक ३१ मे,२००३
क्र.२/एनजीसी/२००३/५११०, दिनांक २३ जून,२००३
क्र.२/एनजीसी/२००३/५३७१, दिनांक २२जुलै,२००३
क्र.२/एनजीसी/२००३/५४११ दिनांक ७ जुलै, २००३ व
क्र.२/एनजीसी/२००३/५५२१,दिनांक ७ जुलै, २००३

प्रस्तावना : संदर्भाधीन दिनांक ३१ मे.१९९७ व दिनांक २१.६.२००० च्या शासन निर्णयान्वये व्यावसायिक पदवी संस्थांचे दर्जानिहाय वर्गीकरण करण्यासाठी मान्यता देण्यात आली आहे. तथापि महाराष्ट्र राज्यातील जी अभियांत्रिकी महाविद्यालये सुरु होऊन पाच वर्षाचा कालावधी झाला आहे अशा महाविद्यालयांचा गुणात्मक दर्जा निश्चित करण्यासाठी श्री.व्ही.एन.गुपचूप यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्यात आली होती. सदर समितीने संस्थेचा दर्जा निश्चित करण्यासाठी खालीलप्रमाणे टक्केवारी दर्शविली होती.

| | | |
|---|---|---|
| १) | टिचींग फॅकल्टी | (३५ टक्के वेट ) |
| २) | कम्प्युटींग फॅसीलीटी | (१५ टक्के वेट ) |
| ३) | लॅबोरेटरी आणि इक्वीपमेंट | (१५ टक्के वेट) |
| ४) | ॲकॅडेमीक परफार्मन्स | (१५ टक्के वेट) |
| ५) | लायब्ररी | ( ६ टक्के वेट ) |
| ६) | लॅण्ड ॲण्ड बिल्डींग | (१० टक्के वेट ) |
| ७) | इतर | ( ४ टक्के वेट ) |

त्यास अनुसरुन ज्या अभियांत्रिकी महाविद्यालयाना पाच वर्ष पूर्ण झालेली आहेत अशा महाविद्यालयांकडून अर्ज मागवून नवीन मानकांप्रमाणे तपासणी करण्यात येवून संचालक, तंत्रशिक्षण मुंबई १ यांनी त्यांच्या संदर्भाधीन दिनांक ३१ मे,२००३ च्या पत्रान्वये जो अहवाल शासनास सादर केला आहे तो मान्य करुन दिनांक २३ जून,२००३ च्या पत्रान्वये संबंधित संस्थांच्या दर्जानिहाय वर्गीकरणास शासनाकडून तात्पुरती (प्रोव्हीजनल) मान्यता देण्यात आली होती. व सर्व संस्थांना त्यांचा दर्जा कळविण्यात यावा म्हणून तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांना कळविण्यात आले होते.

**ATTESTED**
KNa...
PRINCIPAL
K.K.Wagh Institute of Engineering
Education and Research
Hirabai Haridas Vidyanagari
Amrut Dham, Nashik-422 003

तसेच संस्थेकडून लागू केलेल्या दर्जाच्या अनुषंगाने काही हरकती घेण्यात आल्यास संबंधित संस्थेला तंत्रशिक्षण संचालनालयाकडून सुनावणी घेण्यात यावी व आवश्यक असल्यास फेर प्रस्ताव शासनास सादर करावा म्हणून सूचविण्यात आले होते. त्यास अनुसरुन काही संस्थांनी समितीने दिलेला दर्जा संस्थेस मान्य नसल्याबाबत तंत्रशिक्षण संचालनालयाकडे आक्षेप नोंदविल्यानंतर सदर समितीने त्यांच्या कागदपत्रांची पुन्हा तपासणी करुन काही संस्थांचा दर्जा बदलला आहे व ज्या संस्था समितीपुढे आक्षेप नोंदविण्यासाठी उपस्थित राहिल्या नाहीत त्यांना त्यांच्या महाविद्यालयास दिलेला तात्पुरता दर्जा मान्य आहे असे गृहीत धरण्यात आले आहे. तसेच ज्या संस्थांनी दिलेला दर्जा प्रसिद्ध करण्यात येवू नये म्हणून जी विनंती केली आहे त्याचा दर्जा प्रसिद्ध करण्यात आलेला नाही.

शासन निर्णय :- वरील बाब विचारात घेवून आता या शासन निर्णयान्वये ज्या अभियांत्रिकी महाविद्यालयांना दर्जा प्रदान करण्यात आला आहे त्यांची यादी परिशिष्ट " अ " मध्ये जोडून ती निर्गमित करण्यात येत आहे. सदर दर्जा सन २००३-२००४ पासून दोन वर्षासाठी राहील. ज्या अभियांत्रिकी महाविद्यालयांना " ब " ते " ई " दर्जा देण्यात आला आहे. अशा संस्थांनी तसेच ज्या संस्थांचा दर्जा प्रसिद्ध करण्यात आलेला नाही त्या संस्थांनी (परिशिष्ट " अ " मधील ) जर पुढील शैक्षणिक वर्ष २००४-२००५ साठी त्यांच्या संस्थेचे दर्जानिहाय वर्गीकरण करण्यासाठी तंत्रशिक्षण संचालनालयाकडे पुन्हा अर्ज केल्यास व शासनाने विहित केलेले शुल्क भरल्यास त्यांना दर्जा उंचावण्यास पुन्हा संधी देण्यात येईल. तसेच संस्थांना प्रदान करण्यात आलेल्या दर्जाचे पुनर्विलोकन दर २ वर्षानंतर करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( श्री. र. चौरे )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,
संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई (प्रसिध्दीकरीता)
संबंधीत संस्थांना (संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई यांचे मार्फत)
मा.मंत्री, तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव
मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण यांचे स्वीय सहाय्यक
निवड नस्ती तांशि-१

प्रत,
१) अतिरिक्त सचिव (तांत्रिक) भारत सरकार अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, इंदिरा गांधी स्टेड परिसर, इंद्रप्रस्थ इस्टेट, नवी दिल्ली ११०००
२) सहाय्यक शिक्षण सल्लागार (तांत्रिक) भारत सरकार मनुष्यबळ विकास मंत्रालय, (शिक्षण विभाग) पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रीयल ॲश्युरन्स बिल्डींग, दुसरा मजला, चर्चगेट, मुंबई

प.क्र तंशि-विकास-तांत्रि-1829
प्रत प्राचार्य सर्व संबंधीत संस्था यांचेकडे माहिती व कार्यवाहीसाठी सादर अग्रेषीत

18 OCT 2003

(दत्तात्रेय ...)
सहसंचालक
[illegible] नाशिक

| अ.क्र. | संस्थेचे नांव, पत्ता व संस्था सुरू झाल्याचे वर्ष | यापूर्वी संस्थेला दर्जा मिळाल्याचे वर्ष व मिळालेला दर्जा | सुधारित दर्जा |
|---|---|---|---|
| १. | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगाव.<br>स्थापना १९९६. | -- | ड दर्जा |
| २. | श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेचे बापुसाहेब देवरे कॉलेज ऑफ इंजिनियरिंग, देवपूर, धुळे.<br>स्थापना १९८३ | जून,१९९७<br>ब | ब दर्जा |
| ३. | श्रमसाधना ट्रस्ट बॉम्बेचे कॉलेज ऑफ इंजिनियरिंग, बांभोरी, जळगाव.<br>स्थापना १९८३. | जून,१९९७<br>ब | अ दर्जा |
| ४. | नगांव एज्युकेशन सोसायटीचे गंगामाई कॉलेज ऑफ इंजिनियरिंग, नगांव, धुळे. | जून,१९९७<br>ब | -- |
| ५. | क.के.वाघ एज्युकेशन सोसायटीचे कॉलेज ऑफ इंजिनियरिंग, नाशिक.<br>स्थापना १९८४. | जून,१९९७<br>ब | अ दर्जा |
| ६. | टेक्नीकल ॲण्ड मेडिकल एज्युकेशन सोसायटीचे जे.टी.महाजन कॉलेज ऑफ इंजिनियरिंग फेजपूर, जि.जळगाव.<br>स्थापना १९८४. | जून,१९९७<br>ब | अ दर्जा |
| ७. | पुज्य साने गुरूजी विद्या प्रसारक मंडळाचे डी.एन.पटेल कॉलेज ऑफ इंजिनियरिंग शहादा, जि.धुळे.<br>स्थापना १९८३ | मे,१९९७<br>अ | अ दर्जा |
| ८. | प्रवरा रूरल एज्युकेशन सोसायटीचे कॉलेज ऑफ इंजिनियरिंग, लोणी, ता.राहता, जि.अहमदनगर.<br>स्थापना १९८३. | जून,१९९७<br>अ | — |
| ९. | संजिवनी रूरल एज्युकेशन सोसायटी कॉलेज ऑफ इंजिनियरिंग, कोपरगाव, जि अहमदनगर.<br>स्थापना १९८३ | जून,१९९७<br>अ | अ दर्जा |
| १०. | संजय एज्युकेशन सोसायटी कॉलेज ऑफ इंजिनियरिंग नवलनगर, धुळे.<br>स्थापना १९८४ | मे,२०००<br>ब | -- |
| ११. | अमृतवाहिनी शेती शिक्षण संस्थेचे अमृतवाहिनी कॉलेज ऑफ इंजिनियरिंग, अमृतनगर संगमनेर, जि.अहमदनगर.<br>स्थापना १९८३. | जून,१९९७<br>ब | अ दर्जा |

ATTESTED
PRINCIPAL
K.K.Wagh Institute of Engineering Education and Research
Hirabai Haridas Vidyanagari
Amrut Dham, Nashik-422 003

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मान्यतेनुसार राज्यातील खाजगी संस्थेतील अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशक्षमतेत वाढ करण्यासाठी मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
शासन निर्णय :- क्र.टिइएम-२००७/(३०२ /०७)/तांशि-१,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- ३० जून, २००७.

संदर्भ:- अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद , नवी दिल्ली यांची पत्र.

**शासन निर्णय:-** अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने शैक्षणिक वर्ष २००७-२००८ करीता राज्यातील संस्थांच्या विस्तारास मान्यता देताना अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत वाढ करण्यासाठी मान्यता दिली आहे. त्यास अनुसरुन याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

२. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेची मान्यता विचारात घेऊन या शासन निर्णयान्वये सोबत जोडलेल्या परिशिष्ट "अ" मधील संस्थांना शैक्षणिक वर्ष २००७-२००८ करीता त्यांच्या नावासमोर दर्शविल्यानुसार प्रवेशक्षमतेत वाढ करण्यास व अतिरीक्त अभ्यासक्रम सुरु करण्यास खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

१) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधन कारक राहील.

२) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक ( तंत्रशिक्षण ) यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

३) सदर अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणांसाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र विद्यापिठ अधिनियम १९९४ मधील तरतूदीनुसार संबंधित विद्यापिठांची मान्यता/संलग्नीकरण घेणे आवश्यक आहे.

४) संबंधित संस्थेने संचालक ( तंत्रशिक्षण ) यांचेकडे आवश्यक ती संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

५) सदर पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार /पध्दतीनुसार करण्यात येतील.

कृपया मागे पहा.

K.K.WAGH EDU... SOCIETY
CENTRAL OFFICE, NASHIK-3
03 AUG 2007
Inward No. 916

Engg. College
3/8

ATTESTED
PRINCIPAL
K.K.Wagh Institute of Engineering
Education and Research
Hirabai Haridas Vidyanagari
Amrut Dham, Nashik-422 003

६) याशिवाय संचालक ( तंत्रशिक्षण) महाराष्ट्र राज्य मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

( भ. सं. वानखेडे )
अवर सचिव , महाराष्ट्र शासन

प्रति,

१. संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, सर्व.
३. कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई.
४. कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे
५. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापुर
६. सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
७. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
८. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर
९. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.
१०. स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ, नांदेड.
११. डॉ. बाबासाहेबत आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
१२. सर्व संबंधीत संस्था (संचालकांमार्फत)

प्रत माहितीसाठी

१. अतिरिक्त सचिव ( तांत्रिक ), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, इंदिरा गांधी खेल परिसर, इंद्रप्रस्थ इस्टेट, नवी दिल्ली ११०००२.
२. सहाय्यक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डींग, दुसरा मजला, चर्चगेट, मुंबइ.
३. निवड नस्ती.

| | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
|---|---|---|---|---|---|---|
| | अमृतवाहिनी शेती आणि शिक्षण विकास संस्थाचे अमृतवाहिनी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, घुलेवाडी, अमृतनगर, संगमनेर, अहमदनगर-४२२६०८. | १ | सिव्हील इंजि. | ६० | | ६० |
| | | २ | कॉम्प्युटर इंजि. | ६० | | ६० |
| | | ३ | इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलि कम्युनिकेशन इंजि. | ४० | | ६० |
| | | ४ | ईलेक्ट्रॉनिक्स इंजि. | ६० | | ६० |
| | | ५ | इन्फॉरमेशन टेक्नॉलॉजी | ३० | | ३० |
| | | ६ | मॅकेनिकल इंजि. | ९० | | १२० |
| | | ७ | प्रोडॉक्शन इंजि | ३० | | ३० |
| | | ८ | एम ई सिव्हील इंजि.(स्ट्रक्चरल इंजि) | ०० | | १८ |
| | | ९ | एम ई मॅकेनिकल इंजि (मशिनडिझाईन) | ०० | | १८ |
| | | | एकुण | ३७० | | ४५६ |
| २ | चौधरी अतारसिंग यादव मेमोरिअल ट्रस्टचे सिध्दांत कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, मु. पो. सुदुंब्रे, ता. मावळ, पुणे-४१२१०९. | १ | सिव्हील इंजि. | ६० | | ० |
| | | २ | कॉम्प्युटर इंजि. | ६० | | १२० |
| | | ३ | इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलि कम्युनिकेशन इंजि. | ६० | | ६० |
| | | ४ | इलेक्ट्रॉनिक्स इंजि. | ६० | | ६० |
| | | ५ | एमबीए | ६० | | ६० |
| | | ६ | मॅकेनिकल इंजि. | ६० | | ६० |
| | | ७ | इन्फॉरमेशन टेक्नॉलॉजी | ०० | | ६० |
| | | | एकुण | ३६० | | ४२० |
| २३ | क. का. वाघ एज्युकेशन सोसायटीचे के. के. वाघ इन्स्टिटयूट ऑफ इंजिनिअरींग एज्युकेशन ॲण्ड रिसर्च, हिराबाई हरीदास विद्यानगरी, अमृतधाम, पंचवटी, नाशिक-४२२००३. | १ | कॅमिकल इंजि. | ६० | | ६० |
| | | २ | सिव्हील इंजि. | ६० | | ६० |
| | | ३ | कॉम्प्युटर इंजि. | १२० | | १२० |
| | | ४ | ईलेक्ट्रीकल इंजि. | ६० | | ६० |
| | | ५ | इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलि कम्युनिकेशन इंजि. | ६० | | ६० |
| | | ६ | इलेक्ट्रॉनिक्स इंजि. | ० | | ० |
| | | ७ | इन्फॉरमेशन टेक्नॉलॉजी | ६० | | ६० |
| | | ८ | एमसीए | ६० | | ६० |
| | | ९ | एमई प्रोडाक्शन इंजि. (मॅन्युफॅक्चरींग ॲण्ड ऑटोमेशन) | १८ | | १८ |
| | | १० | मॅकेनिकल इंजि. | १२० | | १२० |
| | | ११ | प्रोडक्शन इंजि. | ६० | | ६० |
| | | १२ | एमई सिव्हील इंजि मॅकेनिकल इंजि (स्ट्रक्चर) | ० | | १८ |
| | | १३ | एम ई ईलेक्ट्रीकल इंजि.(कंट्रोल सिस्टीम) | ० | | १८ |
| | | | एकुण | ६७८ | | ७१४ |

ATTESTED

PRINCIPAL
K.K.Wagh Institute of Engineering
Education and Research
Hirabai Haridas Vidyanagari
Amrut Dham, Nashik-422 003

Annexure VII

(92)

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मान्यतेनुसार राज्यातील खाजगी संस्थांना नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यास शासनाची मान्यता देण्याबाबत

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण विभाग.
**शासन निर्णय** :- क्र.टिईएम-२००८/( ४५ /०८)/तांशि-१,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : -२ एप्रिल, २००८ .
संदर्भ:- अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद , नवी दिल्ली यांचे दिनांक १ नोव्हेंबर २००७ चे पत्र. क्र. ७४०-८९-२३१(ई) /आर सी/९४

**शासन निर्णय:-** अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने त्यांच्या संदर्भाधीन पत्रान्वये खालीलप्रमाणे संस्थेस शैक्षणिक वर्ष २००७-२००८ करिता एम.बी.ए. हा नवीन व्यवस्थापन पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम ( ६० प्रवेशक्षमता ) सुरु करण्यास खालीलप्रमाणे मान्यता दिलेली होती. त्यास अनुसरुन याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | अभ्यासक्रमाचे नांव | प्रवेशक्षमता ( शैक्षणिक वर्ष २००८-०९) |
|---|---|---|---|
| १ | कर्मवीर काकाकसाहेब वाघ एज्युकेशन सोसायटीचे के.के. वाघ इंस्टिट्यूट ऑफ इंजिनिअरींग एज्युकेशन अॅण्ड रिसर्च हिराबाई हरिदास विद्यानगरी, अमृतधाम पंचवटी , नाशिक-४२२ ००३ | १ )एम. बी.ए. | १) ० वरुन ६० |

तथापि रिट याचिका क्र. ३९१६/२००१ अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद नवी दिल्ली विरुध्द महाराष्ट्र शासन या याचिकेसंदर्भात दि. १७.०९.२००१ रोजी देण्यात आलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने दि. ३० जून, नंतर अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडून मान्यता प्राप्त प्रस्तावांना पुढील शैक्षणिक वर्षाकरिता मान्यता देण्यात येते. आता या शासन निर्णयाद्वारे उपरोक्त संस्थेस खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून शैक्षणिक वर्ष २००८-२००९ पासून उपरोक्त नमूद केलेले अभ्यासक्रम त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या प्रवेशक्षमतेसह सुरु करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधन कारक राहील.

२) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि

ATTESTED
PRINCIPAL
K.K.Wagh Institute of Engineering
Education and Research
Hirabai Haridas Vidyanagari
Amrut Dham, Nashik-422 003

औपचारिक बार्बीची पूर्तता संचालक ( तंत्रशिक्षण ) यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

३) सदर अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणांसाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र विद्यापिठ अधिनियम १९९४ मधील तरतूदीनुसार संबंधित विद्यापिठांची मान्यता/संलग्नीकरण घेणे आवश्यक आहे.

४) संबंधित संस्थेने संचालक ( तंत्रशिक्षण ) यांचेकडे आवश्यक ती संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

५) सदर पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार /पध्दतीनुसार करण्यात येतील.

६) याशिवाय संचालक ( तंत्रशिक्षण) महाराष्ट्र राज्य मुंबई व संबंधित विद्यापिठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

( भ. सं. वानखेडे )
अवर सचिव , महाराष्ट्र शासन

प्रत,
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नाशिक
संबंधित विद्यापिठ ( संचालकांमार्फत )
संबंधित संस्था (संचालकां मार्फत )
प्रत माहितीसाठी
अतिरिक्त सचिव ( तांत्रिक ), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, इंदिरा गांधी खेल परिसर, इंद्रप्रस्थ इस्टेट, नवी दिल्ली ११०००२
सहाय्यक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डींग, दुसरा मजला, चर्चगेट, मुंबई
निवड नस्ती.

C:\New GR (२).doc